MHPU180003972020

नियमित दिवाणी दावा/६२/२०२०
**धुळा सदु शिंदे वि.. रेवन्नाथ विठोबा दिवेकर**

नि.क्र. **१००** वरील आदेश
(पारित दि. ११/०६/२०२६)

०१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.४ भानुदास भिकाजी सोनवणे यांचे वारस अभिलेखावर घेण्याकामी आणि त्या अनुषंगे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याकामी दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी अर्जास म्हणणे दाखल करुन हरकत नोंदवली.

०२. वादी यांच्या कथनाप्रमाणे दाव्यातील प्रतिवादी क्र. ४ भानुदास भिकाजी सोनवणे यांचे दिनांक २१/०८/२०२५ रोजी निधन झाले आहे. अर्जामध्ये नमूद केल्यानुसार प्रतिवादी क्र. ४ यांना वारस असून त्यांच्या विरुध्द दाव्यास कारण पुढे चालू आहे, त्यामुळे वारस अभिलेखावर घेऊन त्या अनुषंगाने दाव्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. प्रतिवादी यांनी अर्जास म्हणणे दाखल करुन हरकत नोंदवली व अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०३. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अर्ज व अभिलेखाची पाहणी केली. अर्जदार यांनी अभिलेखावर दाखल केलेले नि.क्र. १०३ सोबतचे मृत्युप्रमाणपत्रावरुन प्रतिवादी क्र. ४ भानुदास भिकाजी सोनवणे यांचे दिनांक २१/०८/२०२५ रोजी निधन झाल्याचे सिध्द होते. प्रस्तुतचा अर्ज हा शपथेवर दाखल करण्यात आलेला आहे. अर्जामध्ये नमूद केलेल्या प्रतिवादी क्र. ४ यांच्या वारसांविरुध्द दाव्यास कारण पुढे चालू राहिल्याने त्यांना प्रतिवादी क्र. ४ यांचे वारस म्हणून सामील करणे न्यायोचीत ठरते, त्यामुळे वारसांना मयत प्रतिवादी क्र.४ यांचे वारस म्हणुन अभिलेखावर घेण्यास आणि त्याअनुषंगे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी देणे न्यायोचीत ठरते, त्यावरुन मी खालील आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

०१. अर्जदार यांचा नि.क्र. १०० लगतचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

०२. वादी यांना अर्जामध्ये नमूद प्रतिवादी क्र. ४ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास आणि त्या अनुषंगाने दाव्यामध्ये योग्य ती दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येते.

०३. वादी यांनी दाव्यातील मयत प्रतिवादी क्र.४ यांचे वारसांच्या अनुषंगाने दाव्यामध्ये योग्य ती दुरुस्ती १४ दिवसांच्या आत करावी आणि अभिलेखावर दुरुस्त प्रत दाखल करावी.

०४. दोन्ही पक्षकारांनी आदेशाची नोंद घ्यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by AARISH SAIFODDIN SHAIKH
Date: 2026.06.11 16:30:43 +0530

दिनांक- ११/०६/२०२६.

**(ए. एस. शेख)**
४ थे सह दिवाणी न्यायाधीश,
क. स्तर, दौंड,जि. पुणे.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F file, Order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | :- | Deepak A. Merukar, Grade-3 |
| Court / Panel | :- | A. S. Shaikh<br>4th Jt. C.J.J.D. & Judicial Magistrate First Class (Court No. 4) Daund. |
| Order / Judgment date | :- | 11/06/2026. |
| Order / Judgment singed by the Presiding Officer on | :- | 11/06/2026. |
| Order/ Judgment uploaded on | :- | 11/06/2026. |